Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**Fabruary-2020**

**SPECIAL ISSUE-CCV**

## *Progressive Thoughts in Maharashtra and Need of Social Enlightenment of OBCs*



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Guest Editor:**
Dr. Balaji P. Munde
Associate Professor
Jalna College of
social work ,Jalna
Dist-Jalna

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**Fabruary-2020**

**SPECIAL ISSUE-CCV**

## *Progressive Thoughts in Maharashtra and Need of Social Enlightenment of OBCs*



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Guest Editor:
Dr. Balaji P. Munde
Associate Professor
Jalna College of
social work ,Jalna Dist-Jalna

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**ISSN : 2278-9308**
**February 2020**

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | संत तुकडोजी महाराज आणि त्यांचे समाज प्रबोधन | प्रफुल्ल नारायण आपटे | 1 |
| 2 | ओबीसींच्या एकात्मिक विकासाचे भवितव्य आणि दिशा | मिलिंद शंकरराव दानव | 7 |
| 3 | ओबीसी आरक्षण सद्य:स्थिती : एक अभ्यास शब्दकोष: शिफारस-आयोग-समाजव्यवस्था-श्रमविभाजन-वर्णव्यवस्था-आरक्षण | आम्रपाला भगवान बुरखुंडे | 13 |
| 4 | ओबीसी समाजासाठी महाराष्ट्र शासनाची नवीन आरक्षण धोरणाची दिशा/ वाटचाल | विद्या दगडू वाघमारे | 16 |
| 5 | वंचितांच्या शैक्षणिक समस्या व त्यावरील उपाययोजना (शालेय पोषण आहार- विशेष संदर्भ) | वर्षा शेषराव गाडवे | 21 |
| 6 | तुकडोजी महाराज यांचे समाजप्रबोधन आणि कार्य | शुभांगी विजयराज मोहोड | 25 |
| 7 | स्त्रीमुक्ती आणि स्त्री-पुरुष समानतेचे आग्रही सुधारक, त्यांचे प्रबोधन कार्य आणि स्त्रीमुक्ती चळवळ | शालिनी रखमाजी थोरात | 29 |
| 8 | कामगार चळवळ - नारायण मेघाजी लोखंडे व अण्णाभाऊ साठे यांचे योगदान | प्रिती किशोरे ढेपे | 33 |
| 9 | महाराष्ट्रातील ओबीसीच्या समाजप्रबोधनाची गरज | कु. आम्रपाली ए. भिवगडे | 36 |
| 10 | स्त्रीमुक्तीसाठी समाजसुधारकांचा लढा | प्रा. विशाखा के. मानकर | 42 |
| 11 | महात्मा फुले यांचा सामाजिक सुधारणा विषयक दृष्टीकोण | प्रा.डॉ.विद्या खंडारे– गोवंदे | 48 |
| 12 | वारकरी संप्रदायातील सामाजिकता | डॉ. सुधाकर पं. बोथीकर | 51 |
| 13 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे समाज प्रबोधन आणि सामाजिक न्यायाची चळवळ | प्रा. सुभाष एस. रंगारी | 54 |
| 14 | भारताच्या सांस्कृतिक संवर्धनात संगीत कलेची भुमिका | प्रा.शिवदास वि.शिंदे | 59 |
| 15 | संत गाडगेबाबा यांचे सामाजिक प्रबोधन | प्रा.एस.एन.देशमुख | 61 |
| 16 | जादुटोणा विरोधी कायदा रू सन २०१३ चे विधानसभा विधेयक | प्रा.डॉ. रेणुका दशरथराव बडवणे | 65 |
| 17 | सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीमुक्ती विषयी विचार | प्रा.डॉ. रविंद्र वि.विखार | 69 |
| 18 | सावित्रीबाई फुले यांच्या समाज प्रबोधन पर कविता | डॉ.रंजीता द.जाधव | 72 |

**B.Aadhar** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**February 2020**

# वारकरी संप्रदायातील सामाजिकता

डॉ. सुधाकर पं. बोथीकर
सहाय्यक प्राध्यापक लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर जि. जालना

भारतासारख्या महान संस्कृती असलेल्या देशामध्ये सामाजिक समता, एकात्मता प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्ण योगदान संत मंडळातील प्रमुख संतश्रेष्ठ नामदेवांनी केलेले आहे. त्यांनी महाराष्ट्रापासून ते राजस्थान, गुजरात, पंजाब आदी राज्यांमध्ये भागवत धर्माची पताका फडकवीत नेली. ज्या काळात संत नामदेवांनी अभंगरचना केली त्या काळात समाज जीवनाचा त्यांना बराच अनुभव आलेला होता. व्यक्तिगत यशाची, प्रसिध्दीची इच्छा आणि त्यासाठी वाङ्मनिर्मिती करावी, अशी लेखक म्हणून महत्त्वाकांक्षा ही संताच्या साहित्यनिर्मितीचे कारण नव्हते. समाजाची अवनत स्थिती दूर होऊन, त्याचा विकास व्हावा व्यक्तिच्या चारित्र्याचे उन्नयन व्हावे, जातीभेदांनी विभागलेला समाज ते अडसर दूर करावेत धर्माचे मानवतावादी उदार स्वरुप स्पष्ट व्हावे. विविध धर्म, पंथ आणि देवते यामुळे उडालेला गोंधळ लोकमनातून नष्ट व्हावा, हा वारकरी संप्रदायाचा उद्देश होता.

संतांचे कार्य मुख्यतः धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातील होते. त्यात व्यापक सामाजिक परिवर्तनाचे त्यांचे उद्दिष्ट दिसत नाही. तरीही मर्यादित स्वरुपात का होईना पण संतांनी समता आणि मानवता ही मूल्ये समाजात रुजविली. व्यक्तिच्या चारित्र्यशुध्दीचा आग्रह धरला, पारमार्थिक पातळीवर त्यांनी सर्वसमभाव रुजवला, समाज जीवनातील कर्मकांडाचे व पुरोहित वर्गाचे वर्चस्व कमी केले. भक्तीचे सर्जन सुलभ आणि शुध्द स्वरुप प्रसारित केले. त्यासाठी लोकभाषेचा वापर केला. या संदर्भात गं.बा. सरदार म्हणतात, "त्यांची दृष्टी केवळ स्वतःच्या जीवनावर केंद्रित न होता समाजाच्या उन्नतीचा मार्ग शोधीत होती. लौकित जीवनातील विषयमता नाहीशी करुन, शुद्रांची सामाजिक प्रतिष्ठा व त्यांचे राहणीमान वाढविणे त्यांच्या हाती नव्हते. म्हणून सामाजिक प्रश्नांच्या वाटेला न जाता वारकरी संतांनी फक्त धार्मिक क्षेत्राकडेच आपली दृष्टी बळवली आणि समतेच्या व बंधुभावाच्या तत्वांचा पाठपुरावा करुन सामाजिक विषमतेची धार पुष्कळच कमी केली"[१] वारकरी संप्रदायाचे आध्यात्मिक आणि वाङ्मयीन कर्तृत्व हे मोठे आहेच, पण मुख्य म्हणजे जो सामाजिक बदल तिला अभिप्रेत होता तोच तिच्या संघटनेचा आधारही होता. वारकरी परंपरेचे निर्माते हे चातुर्वण्याच्या व्यवस्थेतून उघडपणे बाहेर पडले होते. ही व्यवस्था जुन्या धर्मग्रंथांची मान्यता असलेली कोणत्याही परिवर्तनास अनुकूल नसणारी आणि भेदभाव वाढीस लावणारी होती. ही व्यवस्था ब्राम्हणांनी टिकवून ठेवली होती, कारण ती त्यांचे आर्थिक आणि सामाजिक अधिकार अखंडपणे टिकवत असे.

**वारकरी संप्रदाय** : महाराष्ट्राला संतांची भूमी असे संबोधले जाते. महाराष्ट्र हा भारतातील अन्य प्रांताहून वेगळा असून त्यामागची खूप मोठी परंपरा या महाराष्ट्रास आहे. संस्कृतीच्या बहुतांश आदर्श परंपरा या महाराष्ट्र भूमीत नांदल्या आहेत. अशा या प्रकृतिभिन्न महाराष्ट्रात 'वारकरी संप्रदायाचा जन्म झाला. 'भागवत संप्रदाय', 'भक्ती संप्रदाय' आणि 'वारकरी संप्रदाय' इत्यादी नावाने हा संप्रदाय ओळखला जातो. महाराष्ट्रातील हा भक्ती संप्रदाय अन्यत्र संप्रदायापेक्षा श्रेष्ठ आहे. हजारे वर्षांपासून पंढरपुरात असलेल्या विठ्ठलाच्या वारीची परंपरा असलेला हा अद्वितीय संप्रदाय आहे.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम हे संत या संप्रदायाचे शिल्पकार असून काही लहान-मोठे संतही त्याचे पायिक आहेत. संत बहिणाबाईंनी या वारकरी संप्रदायाला इमारतीची उपमा पुढील अंभगातून दिलेली आहे.

**"संतकृपा झाली । इमारत फळा आली ।। ज्ञानदेव रचिला पाया । उभारिले देवालया ।।**
**नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।। जनार्दन एकनाथ । स्तंभ दिला भागवत ।।**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।। बहिणी फडकती ध्वजा । निरुपण केले बोजा ।।"**[२]

या अंभगावरुन लक्षात येते की, वारकरी संप्रदायाचा पाया संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी रचला असून त्याचा प्रचार आणि प्रसार करण्याचे अतुलनीय कार्य संत नामदेवानी केले. या संप्रदायाला संत एकनाथांनी आधार दिला. तर या संप्रदायाचे कळस संत तुकाराम ठरले.

संत ज्ञानेश्वराचे ज्येष्ठ बंधू व गुरु निवृत्तीनाथ, दुसरे बंधू सोपानदेव, ज्ञानेश्वरांस ताटी उघडायला लावणाऱ्या, तपस्वी चांगदेवांच्या गुरु मुक्ताबाई, नामदेवांच्या घरचे दास्य स्विकारणाऱ्या संत जनाबाई, ब्रम्हानंदात तल्लीन होऊन चिखल तुडवता तुडवता स्वतःचे अपत्यही तुडवणारा संत गोरोबा, कांदा-मुळा-भाजी यात विठ्ठलाचे अस्तित्व शोधणारा सावता, रामनामाचे सोने चोरणारा नरहरी सोनार, चोखा डोंगा परि भाव न डोंगा असे स्वतः विषयी उद्गार काढणारा चोखामेळा, अस्पृश्यतेविषयीच्या व्यथा व्यक्त

करणारा कर्ममेळा, तसेच सोयराबाई, बंका महार, सेन्हा न्हावी, विसोबा खेचर, जगमित्र नागा, परिसा भागवत, जोगा परमानंद, कान्होपात्रा, भानुदास, दामाजी, निळोबा, संत बहिणाबाई आदी संतकवी आणि संतकवियित्रींनी वारकरी संप्रदायास मोठे करण्यात आपले जीवन वाहिले.

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय हा विश्वव्यापक परमात्म्याच्या प्रकाशाची निर्गुण व सगुण स्वरुपात उपासना करणारा धर्म आहे. प्राचीन काळात भगवान श्रीकृष्णाने या धर्माचे पुनरुज्जीवन केले आणि पुढे गीतेतील जे तत्त्वज्ञान आहे तेच या धर्माचे तत्त्वज्ञान बनले. मध्ययुगीन कालखंडात संत ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाचे संघटन केले. पुढे त्याचा संत नामदेवांनी त्याचा प्रसारप्रचार केला. या संघटन कार्यामध्ये अनेक संतांनी योगदान दिले. अलिकडेच शं.दा. पेंडसेंनी भागवत धर्माचे मूळ वैदिक धर्माच्या मुळाशी असल्याचे म्हटले आहे. त्याविषयी ते म्हणतात, "भग-सविता-सूर्य-विष्णू भगवान या परंपरेने श्रीविष्णूच्या उपासनेचा मार्ग विकसित झाला"[३] यापुढे श्रीविष्णु-श्रीकृष्ण-श्रीविठ्ठल यांच्या उपासणेचा सदाचारावर उभा राहिलेला होता. तोच ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आदी संतांनी आपल्या अभंगवाणीतून आणि ग्रंथनिर्मितीमधून स्वयंस्फूर्तपणे चालवला.

संत ज्ञानेश्वरांनी विश्वविख्यात 'ज्ञानेश्वरी', एकनाथांनी 'भागवत', नामेदव-तुकाराम या संतोचे 'अभंग' हे या भागवत संप्रदायाची प्रस्थानत्रयी म्हणून ओळखली जाते. पंढरपुरचा श्रीविठ्ठल हे या संप्रदायातील वारकऱ्यांचे आराध्य दैवत आहे. 'रामकृष्णहरी' हा या संप्रदायाचा मंत्र असून भजन, किर्तन, प्रवचन, नामस्मरण, ही भक्तीची साधने आहेत. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, नामदेव, एकनाथ, तुकाराम आदी संत हे या संप्रदायाचे मार्गदर्शक आहेत. पंढरपूर, आळंदी त्र्यंबकेश्वर, सासवड, मुक्ताईनगर, मंगळवेढे, पैठण, देहू ही या संप्रदायाची तीर्थक्षेत्रे आहेत. आत्मा आणि परमात्मा एकच मानने हे या भागवत धर्माचे तत्त्वज्ञान आहे. दैवत म्हणून श्रीविठ्ठलावरील एकनिष्ठा आणि जातीभेद विरहित भक्तिमार्ग वारकऱ्यांनी स्विकारलेला आहे. वेद, उपनिषदे, भगवतगीता, भागवत, रामायण, महाभारत हे या संप्रदायाचे प्रमाणभूत ग्रंथ आहेत. वारकरी वाङ्मयीन परंपरेत लिखित आणि मौखिक या दोन्ही संस्कृती एकाचवेळेस नांदत होत्या. त्याच्या जोडीला या दोन्ही प्रवृत्तींमध्ये पुराण, हरिकथा, पारायण, प्रवचन आणि पोथी-पाठ यासारखे अनेक वाङ्मय प्रकारही होते. अविष्कारांची ही विविध माध्यमे ब्राम्हणांपासून ते अस्पृश्यांपर्यंत सर्वच जातीजमातींच्या सामूहिक सहकार्यावर अवलंबुन होती. एक सामाजिक संस्था म्हणून वाङ्मयाची विविध अंगे यामध्ये प्रतिबिंबित झालेली दिसतात. एकंदरीत विचार करता वरपासून खालपर्यंतच्या वर्गात सामाजिक संयोगाची प्रक्रिया त्या काळात घडून येत होती.

**आचारसंहिता :** कोणताही धर्म हा आचारप्रधान असतो. त्याला वारकरी संप्रदायही अपवाद कसा ? वारकरी संप्रदायाची आचारसंहिता ही अगदी साधी सरळ आणि सोपी आहे. ती सहजपणे कोणासही आचारणात आणता येईल. अशी आहे त्यामध्ये वारकऱ्यांच्या गळयात तुळशीच्या मण्यांची माळ असावी, नीत्यनियम म्हणून स्नानानंतर 'ज्ञानेश्वरी' व 'हरिपाठांचे अभंग वाचणे, वर्षाकाठी 'आषाढी' आणि 'कार्तिकी' अशा दोन पंढरीच्या वाऱ्या करणे, कपाळावर गोपीचंदणाचा टिळा लावणे, एकादशी आणि सोमवार हे व्रत करणे, भजन कीर्तन, प्रवचन करणे, सत्संगती करणे, एकवचनी व एकपत्नी व्रत करणे, इत्यादी.

वारकरी संप्रदायाची लोकप्रियता : बाराव्या - तेराव्या शतकापासून वारकरी संप्रदाय हा इतर संप्रदायाच्या तुलनेने अधिक लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे सर्व धर्मियांना प्रवेश, स्त्री-पुरुष कोणीही असो त्यास प्रवेश, प्रपंच करुनही परमार्थ करुनही करता येणे ही शिथिलता होती. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान सामान्यांनाही समजेल असे आहे. सर्वसामान्यांना सहजपणे आचरणात आणता येईल अशी आचारसंहिता होती.

पुराण, प्रवचन, पारायण, पाठ, इत्यादींसह ओवी, अभंग, पद, भूपाळी, पाळणे, गण, गवळण, विराणी, श्लोक, कृष्णलीला, पद्यचरित्र यांसारख्या अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या वाङ्मय प्रकाराचा यात समावेश होता. तसेच गोंधळ, रुपक, भेदिक, जागरण, ललित निरनिराळ्या वेळांच्या आरत्या, गोफ, गरुड, भारुड यांसारख्या नाट्यात्मक आणि संगीतात्मक प्रकारांचाही काही प्रसंगी प्रयोग होत असे. मंत्र, नामस्मरण, हरिपाठ हे वैयक्तिक पूजेसाठी तर कथा, पोथी, सप्ताह, काला, पालखी, वारी, भजन यामुळे वारकरी संप्रदायाची लोकप्रियता वाढली.

वारकरी संप्रदायाने विकसित केलेले आणखी एक तितकेच जोरदार तंत्र म्हणजे 'दिंडी' होय. यात्रेकरुना मिरवणुकीने घेऊन जाणारी दिंडी म्हणजे वारकरी आचारसंहितेचा एक आवश्यक भाग आहे. शेकडो लहानमोठ्या दिंड्या महाराष्ट्रातील दूरदूरच्या खेडेगावातून निघून पंढरपुरापर्यंतचे अंतर पायी चालत चंद्रभागेच्या वाळवंटात दाखल होतात. वारकऱ्यांचे संपुर्ण विकेंद्रीकरणाचे तत्त्व इथेही कार्यरत आहे. पूर्वी दिंड्या पंढरपूरच्या एका तीर्थक्षेत्री एकत्र येत; पण नंतरच्या काळात या दिंड्या वर्षातून दोनवेळा जेथे एकत्र येतात अशी अनेक प्रादेशिक केंद्रे वारकऱ्यांनी उभी केली. थोर / श्रेष्ठ संतांची जन्मस्थळे असणारी ही ठिकाणे महाराष्ट्र आणि

कर्नाटकांमध्ये आहेत. तुकारामांचे देहू, ज्ञानेश्वरांचे आळंदी, एकनाथांचे पैठण, चोखामेळयाचे मंगळवेढे, गोराकुंभाराचे तेर, मुक्ताबाईचे एदलाबाद अशी ठिकाणे वारकऱ्यांच्या दिंड्यांच्या दिंड्याची केंद्र म्हणून निर्माण झाली.

वारकरी संप्रदाय ज्या प्रदेशात, समूहांत प्रभावी राहिला त्या सर्वांचा यात समावेश होतो हे यात विशेष आहे. दिंडीचे निघणे, वारकरी मार्गावर होणारे मुक्काम आणि तीर्थक्षेत्री पोहचणे याचे वेळापत्रक अनेक वर्षांच्या अनुभवाने आपोआप सिध्द झालेली आहे. यामुळे वारकरी संप्रदाय महाराष्ट्रात लोकप्रिय ठरला.

**संदर्भ टिपा :-**

१) सरदार गं.बा., महानुभाव व संत वाङ्मय, य.च.म.मु.वि. नाशिक, पृ. ५६.

२) जावडेकर शालिनी (संपा.) संत बहिणाबाईची गाथा, अ.क्र. १४३

३) आपटे वासूदेव गोविंद, मराठी शब्द रत्नाकर, पृ. २३.